जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३३२ दिनांक - २१/०८/२०२४**

विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणे शहर

**जबरदस्तीने गळयातील सोन्याची चेन चोरणारे ०४ आरोपीतांचा शोध घेऊन दोन गुन्हे उघडकीस आणले बाबत**

विश्रामबाग पोलीस ठाणे गुरनं २११/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३,कलम ३०९(४),३(५) अन्वये दाखल गुन्हयात लक्ष्मी रोड,पुणे येथे दिनांक १२/०८/२०२४ रोजी फिर्यादी हे त्याच्या दुचाकीवरुन रात्री ००/३० वा.जात असताना दोन दुचाकीवर चार अनोळखी इसम येवुन त्यांनी फिर्यादीस,तु आमच्या अंगावर का थुंकला असे भांडण काढुन फिर्यादीला हाताने मारहाण करुन फिर्यादीचे गळयातील सोन्याची चेन हिसकावुन नेली होती. सदर गुन्हयाचा तपास करणे बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी तपास पथकाचे अधिकारी मनोज बरुरे व अंमलदार यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले होते.

दाखल गुन्हयाचे तपासात विश्रामबाग तपास पथकातील अंमलदार राहुल मोरे यांनी तांत्रीक विश्लेषनाचे आधारे व गोपणीय खबरी यांचे मदतीने सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **१) कासीम आसीफ अन्सारी वय २२ वर्षे,रा.मोमीनपुरा,गंजपेठ,पुणे २) अनिकेत अनिल फासगे वय २२ वर्षे,रा. वस्ताद साळवे स्मारकाचे पाठीमागे,गंज पेठ,पुणे ३) आश्रफ गवुस सय्यद वय २० वर्षे,रा.नवीन म्हाडा,बिल्डींग न २१,तिसरा मजला,फ्लॅट नं ३१०,वैदुवाडी,हडपसर,पुणे व** ४) **विधीसंघर्षीत बालक वय १७ वर्षे ११ महिने, रा.इंदिरा नगर अप्पर,पुणे** यांनी केल्याचे निष्पन्न केले.

गुन्हयातील आरोपीत यांना क्रांती चौक,बुधवार पेठ,पुणे येथुन पोउपनि बरुरे व पोलीस अंमलदार गणेश काठे,राहुल मोरे,आशिष खरात,संतोष शेरखाने,सात्ताप्पा पाटील,अर्जुन थोरात यांनी नमुद आरोपीस पकडुन त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्यांनी वारजे पोलीस स्टेशन हददीत एका दुचाकीस्वारास अडवुन त्यांच्या गळयातील सोन्याची साखळी हिसकावुन घेतल्याचे कबुल केले असुन सदर बाबत वारजे माळवाडी पोलीस ठाणेस गुरनं ३११/२०२४ अन्वये गुन्हा नोंद आहे. तसेच आरोपीतांकडुन गुन्हयात वापरलेल्या दोन दुचाकी व दोन्ही गुन्हयातील १) ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन व २) १८ ग्रॅम वजनाची सोन्याची सोन्याची चेन जप्त करण्यात आलेल्या आहेत.गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मनोज बरुरे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री.प्रवीणकुमार पाटील,मा.पोलीस उप आयुक्त परि. ०१ श्री.संदिपसिह गिल्ल,मा.सहायक पोलीस आयुक्त,श्री साईनाथ ठोंबरे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विश्रामबाग पो.स्टे.श्रीमती विजयमाला पवार,पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री अरुण घोडके,तसेच पोलीस उपनिरीक्षक मनोज बरुरे,पोलीस अंमलदार मयुर भोसले,गणेश काठे,आशिष खरात,अर्जुन थोरात,राहुल मोरे,साताप्पा पाटील,संतोष शेरखाने व सागर मोरे यांनी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस
पोलीस ठाणे
पुणे पोलीस
फरासखाना
फोन नं. ०२०२४४२२२५०
विश्रामबाग
फोन नं. ०२०२४४५७७५०